मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
। पश्चिम महाराष्ट्र ।
www.rajdand.com
follow us : /rajdandlive
२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २८७ सातारा ✻ सोमवार ✻ दि. १ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

## अर्थसंकल्पात 'एसटी'ची झोळी रिकामीच



**मुंबई :** अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महापालिकांच्या क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरून २१ टक्के प्रस्तावित केला आहे.

यामुळे सर्वसामान्य नागरिक, उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळेल. मात्र डिझेलचा सर्वात मोठा ग्राहक असलेल्या एसटीला त्याचा लाभ होणार नाही. एसटीच्या बहुतांश गाड्यांमध्ये ग्रामीण भागात डिझेल भरले जाते.

त्यामुळे एसटीला या करातून सूट मिळणार नाही. त्याचप्रमाणे विकास कामांसाठी व नवीन गाड्या घेण्यासाठी अर्थसंकल्पात एका पैशाचीही तरतूद करण्यात आलेली नाही, अशी खंत महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी काँग्रेसने व्यक्त केली.

# कायद्याची नवी भाषा; ब्रिटिशकालीन फौजदारी कायदे आजपासून हद्दपार

## कालावधीचे बंधन,तंत्रज्ञानाचा विपुल वापर

**नागपूर :** स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच कायद्याची भाषा आमूलाग्र बदलणार आहे. आज, सोमवारपासून तीन ब्रिटिशकालीन फौजदारी कायदे हद्दपार होत असून त्याजागी भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे तीन नवे कायदे अमलात येत आहेत. यापुढे सर्व फौजदारी गुन्हे नोंदवण्यापासून ते त्यांचा तपास व न्यायालयीन प्रक्रिया नव्या संहितांनुसार राबविली जाईल.

ब्रिटिशकालीन भारतीय दंड संहिता (आयपीसी), फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) आणि भारतीय पुरावा कायद्याच्या जागी केंद्राने २०२३ मध्ये तीन नवे फौजदारी कायदे संसदेत मंजूर करून घेतले. नव्या कायद्यांत तीन वर्षांच्या कालावधीत संपूर्ण न्यायप्रक्रिया पूर्ण करण्याची तरतूद आहे. कायद्याच्या ३५ कलमांमध्ये न्यायप्रक्रियेसाठी कालावधीचे बंधन दिले आहे. फौजदारी खटल्यांमध्ये युक्तिवाद पूर्ण झाल्यावर एक ते दीड महिन्याच्या कालावधीत निर्णय सुनावण्याची तरतूद आहे. न्यायालयात पहिल्या सुनावणीनंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. संघटित गुन्हेगारी, झुंडबळी, दहशतवाद याची स्पष्ट परिभाषा करण्यात आली आहे. नव्या कायद्यांत साक्षीदार संरक्षण योजनेचाही समावेश आहे. फरार गुन्हेगारांची देशांतर्गत आणि देशाबाहेरील संपत्ती जप्त करण्याबाबत नव्या कायद्यांत उल्लेख आहे. भारतीय न्याय संहितेत महिला आणि बालकांवरील गुन्ह्यांबाबत नवीन तरतुदी आहेत. महिला गुन्हेगारांच्या तपासप्रक्रियेसाठी स्पष्ट निर्देश दिले आहे. नवे कायदे लागू झाल्यावर चार दर्जाचे न्यायिक अधिकारी राहतील. यात प्रथम न्यायदंडाधिकारी, द्वितीय न्यायदंडाधिकारी, सत्र न्यायाधीश आणि कार्यकारी न्यायाधीश यांचा समावेश आहे. नव्या कायद्यात तृतीय न्यायदंडाधिकारी, महानगर न्यायदंडाधिकारी हे पद संपुष्टात आणले गेले आहे. नव्या कायद्यात पहिल्यांदा गुन्हा करणाऱ्यांवर सौम्यता दाखवण्याची तरतूद आहे. याशिवाय काही गुन्ह्यांमध्ये शिक्षा म्हणून सामुदायिक सेवेची तरतूद करण्यात आली आहे.



### तंत्रज्ञानाला अधिक महत्त्व

**नव्या भारतीय साक्ष अधिनियमांतर्गत डिजिटल पुराव्यांनाही समान पद्धतीने ग्राह्य धरण्यात येईल. 'लोकेशन' आधारित पुरावे, व्हाईसमेल, सर्व्हर लॉग यांना आता पुरावा मानले जाईल. न्यायवैद्याकशास्त्राची (फॉरेन्सिक) भूमिका नवे कायदे लागू झाल्यावर फार महत्त्वपूर्ण होईल. सात वर्षांहून अधिक शिक्षा असलेल्या प्रत्येक गुन्ह्यात न्यायवैद्याकशास्त्र तपास बंधनकारक असेल. संपूर्ण देशभरात येत्या पाच वर्षांत न्यायवैद्याक शास्त्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधा तसेच प्रशिक्षित मनुष्यबळ पुरवण्यात येईल. कोणतीही जप्तीची कारवाई करताना त्याचे चित्रीकरण करणे बंधनकारक असेल. घटनेच्या तीन दिवसांच्या आत एफआयआर ऑनलाइन प्रकाशित केला जाईल. 'ई-एफआयआर', डिजिटल आरोपपत्र, बलात्कार पीडितांचे 'ई-स्टेटमेंट', साक्षीदारांना 'व्हर्च्युली' उपस्थित राहण्याची मुभा यासह तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर नव्या कायद्यांमुळे करता येणार आहे.**

**'तार्किक कारणांसह विरोध नोंदवा'**

थनव्या कायद्यांसंदर्भात बार काऊंसिल ऑफ इंडियाने एक पत्र प्रसिद्ध केले आहे. नव्या कायद्याबाबत वकिलांच्या काही समस्या असल्यास, कुठल्या कलमांना विरोध असल्यास त्यांचा गांभीर्याने विचार करण्यात येणार असल्याची ग्वाही बार काऊंसिलने दिली आहे.

थवकील संघटनांनी तार्किक आणि व्यावहारिक कारणांसह आपला विरोध नोंदवावा. त्याबाबत केंद्राशी संवाद साधला जाईल, अशी भूमिका बार काऊंसिलने घेतली आहे. मात्र, निदर्शने, संप आदी करू नये अशी विनंती करण्यात आली आहे.

३० जूनच्या मध्यरात्री १२ वाजतानंतर घडलेल्या प्रत्येक गुन्ह्याची नोंद नवीन फौजदारी कायद्यानुसार करावी, असे आदेश देण्यात आले आहेत. परंतु, रविवारी मध्यरात्रीपूर्वी घडलेली घटना असेल किंवा तक्रारकर्ता काही कारणास्तव उशिरा पोलीस ठाण्यात आला असेल तर त्या घटनेची नोंद जुन्या कायद्यानुसार केली जाईल.

# शेतकऱ्यांना मोफत वीज; महावितरणलाच दिलासा



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना मोफत विजेची घोषणा केली असली तरी गेली काही वर्षे केवळ पाच-दहा टक्केच बिलवसुली होत असल्याने बहुतांश कृषीपंपांसाठी सध्या एकप्रकारे मोफतच वीजपुरवठा होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केलेल्या घोषणेचा मोठा राजकीय लाभ मिळण्याची सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांना अपेक्षा आहे. मात्र त्यापेक्षा कृषी वीजबिलाची रक्कम राज्य सरकारकडून मिळणार असल्याने महावितरणला अधिक आर्थिक दिलासा मिळणार आहे.

राज्यात सध्या सुमारे ४६ लाखांहून अधिक कृषीपंप असून सरकार ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज पुरविणार आहे. या निर्णयाचा लाभ ४४ लाख सहा हजार शेतकऱ्यांना होईल, असे अजित पवार यांनी अर्थसंकल्पात घोषणा करताना सांगितले होते. सध्या कृषीग्राहकांना प्रतियुनिट सुमारे दीड रुपयाप्रमाणे बिल पाठविले जाते. वार्षिक सुमारे सहा हजार कोटी रुपयांची बिले पाठविली जातात. त्यापैकी केवळ पाच टक्के म्हणजे २८०-३०० कोटी रुपयांपर्यंतच बिल वसुली होते. काही काळापूर्वी हे प्रमाण आठ-दहा टक्क्यांवर गेले होते, अशी माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे सध्या एकप्रकारे ९५ टक्के कृषीपंपांच्या बिलांची वसुली होत नाही व मोफतच वीज पुरविली जात आहे.

कृषी वीजबिलाची थकबाकी ४५ हजार कोटी रुपये आहे. सर्व ग्राहकांची एकूण थकबाकी ७४ हजार कोटी रुपयांच्या घरात असून उपसा सिंचन योजना, शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दिवाबत्ती योजना आदींच्या वीजबिलांची थकबाकीही आठ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे.

# प्रत्येक रामभक्ताचं मत भाजपाला मिळेल हा अहंकार : उमा भारती

४ जून या दिवशी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागला. हा निकाल लागून आज २६ दिवस झाले आहेत. तरीही निकालांवरच्या चर्चा आणि प्रतिक्रिया थांबताना दिसत नाहीयेत. प्रत्येक रामभक्ताने मोदींना मत दिलं असेलच असं नाही असं आता भाजपा नेत्या उमा भारतींनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि पश्चिम बंगाल या चारही राज्यांमध्ये भाजपाला फटका बसला. राम मंदिर उभारुनही उत्तर प्रदेशात म्हणावं तसं यश भाजपाला मिळालं नाही. यावर आता उमा भारतींनी प्रतिक्रिया दिली आहे.

उत्तर प्रदेशात लोकसभा निवडणुकीचा जो निकाल लागला त्यासाठी मोदी आणि योगी आदित्यनाथ यांना जबाबदार धरता येणार नाही. १९९२ मध्ये बाबरी मशिद पाडल्यानंतरही भाजपाला पराभवाचा फटका बसला होता. तरीही आम्ही राम मंदिर बांधलं. राम मंदिर हे आमच्या अजेंड्यावर होतं आणि आम्ही ते पूर्ण केलं. आम्ही राम मंदिर हे कधीही मतांशी जोडलेलं नाही. याच प्रमाणे मथुरा आणि काशी या ठिकाणी असलेल्या धर्मस्थळांचेही वाद आहेत. मात्र आम्ही त्या प्रश्नांचा संबंध आम्हाला मिळणाऱ्या मतांशी जोडत नाही. हिंदू समाजाचा एक प्रकारचा स्वभाव आहे, तो समजून घेतला पाहिजे. सामाजिक व्यवस्था धर्माशी जोडायला नको असंही उमा भारतींनी म्हटलं आहे.

प्रत्येक रामभक्ताचं मत आपल्यालाच मिळेल हा अहंकार भाजपाने बाळगायला नको. तसंच हा विचारही चुकीचा आहे की जो आपल्याला मत देत नाही तो रामभक्त नाही हा विचारही गैर आहे. ज्यांनी मतं दिली नाहीत तेदेखील रामभक्त आहेत. उत्तर प्रदेशात भाजपाला फटका बसला कारण निष्काळजीपणा नडला. मात्र यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जबाबदार धरता येणार नाही असंही उमा भारती म्हणाल्या. उत्तर प्रदेशातल्या ८० पैकी ३३ जागांवरच भाजपाला २०२४ च्या निवडणुकीत विजय मिळवता आला. मागच्या निवडणुकांमध्ये भाजपाने ७० हून जास्त जागा जिंकल्या होत्या.

इस्लाम मानणारे लोक हे सामाजिक आणि धार्मिक व्यवस्था एकच आहे अशा दृष्टीने पाहतो. त्यामुळे सामाजिक व्यवस्थेप्रमाणे त्या वर्गाचं मतदान केलं जातं. उत्तर प्रदेशमध्ये भाजपाला अपयश आलं याचा अर्थ असा होत नाही की लोकांची रामावरची श्रद्धा कमी झाली असंही उमा भारतींनी म्हटलं आहे. भाजपात अहंकार आला आहे असं मला वाटत नाही. आम्ही पराभावाचं चिंतन करतो आहोत. पंतप्रधान यांनी कधीही स्वतःला पंतप्रधान म्हटलेलं नाही ते स्वतःचा उल्लेख प्रधानसेवक असा करतात. विकासाच्या अजेंड्यावर ते काम करत आहेत.असंही मत उमा भारतींनी मांडलं.


# केळवली धबधब्यात युवक बुडाला

**सातारा :** केळवली ता. सातारा येथील धबधबा परिसरात कराड येथील ऋषिकेश रमेश कांबळे वय २२ हा युवक आपल्या मित्रांसमवेत रविवारी सकाळी पर्यटनास आला होता. यावेळी धबधब्याखालील पाण्यात पोहण्याचा मोह न आवरल्याने मित्रांसमवेत ऋषिकेश ही मित्रांसमवेत केळवली धबधब्यात उतरला. मात्र, येथील पाण्याचा अंदाज न आल्याने यामध्ये तो बुडाला. ही घटना रविवार, दि. ३० जून रोजी सकाळी घडली. यावेळी मित्रांनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला पण त्यामध्ये त्यांना यश आले नाही.

याबाबत घटनास्थळावरुन व सातारा तालुका पोलिसांनी दिलेली माहिती अशी, रविवार हा सुट्टीचा दिवस असल्याने केळवली धबधब्याकडे पर्यटकांचा विशेष ओढा असतोच. त्यानुसार ऋषिकेश व त्याचे मित्र यांना पोहण्याचा मोह न आवरल्याने ते पाण्यात उतरले. याच दरम्यान, या पाण्यातील असणाऱ्या भोवऱ्याजवळ हा युवक गेला असल्याने कदाचित त्यामध्येच तो बुडाला असावा, हा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, रविवारी दुपारी शिवेंद्रसिंहराजे रेस्कयु टीमने एक तासभर घटनास्थळी जावून शोध मोहीम सुरु केली. पण या दरम्यान, हा केळवलीचा धबधबा दोनशे फुटावरुन वाहत येणाऱ्या पाण्याचा विसर्ग अन तेथील पाण्याचा भोवरा यामुळे शोधकार्यातील बोटीमध्ये पाणी जावू लागले. याचवेळी गळ टाकून शोध घेण्याचा प्रयत्न केला पण तो ही असफल ठरला. त्यानंतर रेस्कयू टीम ही एक तासानंतर घटनास्थळावरुन निघून गेली.

या धबधब्यातील यापूर्वीची बुडालेल्यांची पार्श्वभूमी पाहता आज रविवारी बुडालेला ऋषिकेशला शोधण्यात दोन तीन दिवस जावू शकतील, असे प्रत्यक्षदर्शी व रेस्क्यू टीमच्यावतीने बोलले जात आहे. दरम्यान, ऋषिकेश कांबळे हा पाण्यात बुडाल्याची माहिती त्याच्या कुटुंबियांना सायंकाळी सातारा पोलिसांनी सांगितल्यानंतर त्यांचे नातेवाईक साताऱ्यात आले आहेत. आता शोधकार्य पुन्हा उद्या रेस्कयू टीम करणार आहे. याबाबत सातारा तालुका पोलीस ठाण्यात याबाबतची नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरु होती.

## महत्त्वाचे



### राज्याच्या मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक यांची नियुक्ती

**मुंबई :** राज्याच्या मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक (डींक्षरींर डरीपळज्ञ ख-ड) यांची नियुक्ती झाली असून ते या पदावर विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी असतील. सुजाता सौनिक या १९८७ बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. सुजाता सौनिक याचे पती मनोज सौनिक यांनीदेखील राज्याचे मुख्य सचिव म्हणून काम पाहिले आहे.

सुजाता सौनिक यांनी या आधी राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार सांभाळला आहे. त्यानंतर आता त्यांना मुख्य सचिवपदाची संधी मिळाली आहे. सुजाता सौनिक यांना मुख्य सचिवपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ लाभणार असून जून २०२५ मध्ये त्या निवृत्त होणार आहेत. रविवारी संध्याकाळी ५ वाजता मावळते मुख्य सचिव नितीन करीर यांच्याकडून त्या सूत्रे हाती घेणार आहेत. सुजाता सौनिक या राज्याच्या वरिष्ठ अधिकारी असून त्या निवृत्त आयएएस अधिकारी मनोज सौनिक यांच्या पत्नी आहेत. या आधी मनोज सौनिक यांनीही राज्याचे मुख्य सचिव म्हणून काम केलंय. सुजाता सौनिक यांच्या नियुक्तीमुळे आता पती आणि पत्नी मुख्य सचिव होण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.

## लोणावळ्यात धबधब्यातून एकाच कुटुंबातील ५ जण गेले वाहून
# दोघांचे मृतदेह सापडले, तिघांचा शोध सुरु



**लोणावळा :** लोणावळाशहरात वर्षविहारासाठी गेलेल्या एकाच कुटुंबातील सगळ्यांना जीव गमवावा लागला आहे. भुशी धरणाच्या मागील बाजूला असलेल्या एका धबधब्याच्या प्रवाहातून ५ जण धरणात वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यापैकी २ जणांचा मृतदेह सापडला असून इतर तिघांचा शोध शिवदुर्ग रेसक्यू पथकाकडून सुरु आहे. रविवारी दुपारी साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

लोणावळा परिसरात आज सकाळपासून जोरदारपाऊससुरू आहे. भुशी धरणाच्या परिसरात जोरदारपाऊसझाल्याने डोंगर भागातून मोठ्या प्रमाणात धबधबे प्रवाहित होऊन धरणात येत असल्याने दुपारी १ वाजण्याच्या सुमारास धरण देखील ओव्हर फ्लो झाले आहे. सकाळच्या सत्रात धरण परिसरात पर्यटनासाठी आलेले काही पर्यटक रेल्वेचे विश्रांती गृह असलेल्या भागात डोंगरातून वाहणाऱ्या धबधब्यातून वाहणाऱ्या प्रवाहात भिजण्याचा आनंद घेत होते.

दरम्यान सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे सदरचा धबधब्यातीलपाणीवाढत होते, पाण्याच्या या प्रवाहामुळे ५ जण पाण्याच्या वेगाने धरणात वाहून गेले. ही माहिती समजताच लोणावळा शहरचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्यासह त्यांची टीम तसेच लोणावळ्यातील शिवदुर्ग रेस्क्यू पथक, मावळ वन्य जीव रक्षक टीम व स्थानिक युवक यांनी घटनास्थळी जात शोध मोहीम सुरू केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार हे कुटुंब वानवडी येथील सय्यदनगर भागातील आहेत.

# ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणासाठी संविधानात बदल करावा लागेल

## काँग्रेसचा नितिशकुमारांना पाठिंबा

जदयूने बिहारमधील आरक्षण मर्यादा नवव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली होती. याच्या दुसऱ्याच दिवशी प्रमुख विरोधी पक्षाची भुमिका आली आहे. ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणासाठी संविधानात बदल करावा लागेल; काँग्रेसचा नितिशकुमारांना पाठिंबा आरक्षणाची ५० टक्क्यांपेक्षा अधिक मर्यादा करण्याच्या नितीशकुमार यांच्या मागणीलाकाँग्रेसनेआज पाठिंबा देणारी भुमिका घेतली आहे. यासाठी संसदेत कायदा संमत केला जावा असे वक्तव्यकाँग्रेसनेकेले आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी याबाबतची पोस्ट केली आहे. जदयूने बिहारमधील आरक्षणमर्यादा नवव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली होती. याच्या दुसऱ्याच दिवशी प्रमुख विरोधी पक्षाची भुमिका आली आहे. जदयूच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक शनिवारी पार पडली. यामध्ये उच्च न्यायालयाने बिहारचे वाढीव आरक्षण रद्द करण्यात आल्यावरून चर्चा करण्यात आली.बिहार सरकारने दिलेले ६५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आले आहे. यावरून राजकीय ठरावही करण्यात आला आहे. यामध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला राज्य कायद्याचा राज्यघटनेच्या नवव्या अनुसूचीमध्ये आरक्षण



मर्यादेच्या वाढीचा समावेश करण्याची विनंती करण्यात आली आहे. यामुळे न्यायालयीन निर्णयांना टाळता येईल. जदयूने मागणी केली खरी परंतू केंद्रात आणि राज्यात त्यांचा मित्रपक्ष भाजपा मौन बाळगून असल्याची टीका रमेश यांनी केली आहे. ५० टक्के मर्यादेच्या पुढे आरक्षणाचे कायदे नवव्या अनुसूचीमध्ये आणणे हा काही उपाय नाहीय. कारण २००७ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार असे कायदे न्यायिक पुनरावलोकनाच्या अधीन आहेत. अशावेळी संसदेसमोर एकच पर्याय उरतो तो म्हणजे संविधानात संशोधन करणे, असे रमेश म्हणाले आहेत.

# धारावी पुनर्विकासात मदर डेअरीच्या जागेवरून वाद

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कुर्ल्यातील मदर डेअरीची ८.५ हेक्टर जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात कुर्ल्यातील रहिवाशांनी जनआंदोलन सुरू केले असून, या जनआंदोलना अंतर्गत कुर्ल्यातील जनतेने आता पोस्टकार्ड आंदोलन पुकारले आहे.

मदर डेअरीच्या जागी डीआरपीपीएलचा सरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी, या पोस्टकार्डच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात येणार आहे. सरकारचा निर्णय रद्द करणारे पत्र पंतप्रधान आणि एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवले जाणार आहे. या आंदोलनात आता काँग्रेसच्या खा. वर्षा गायकवाड आणि आ. आदित्य ठाकरे यांनी देखील सहभाग नोंदवला असून, या दोन्ही नेत्यांनी एकत्रितपणे मदर डेअरी जागेची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान आदित्य ठाकरे यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या मदर डेअरीच्या जागेबाबत स्थानिक नागरिकांची भूमिका नेमकी काय आहे? हे देखील समजून घेतले. त्यानंतर आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना आ. ठाकरे म्हणाले की, धारावी पुनर्विकास प्रकल्पाला आमचा कोणाचाही विरोध नाही. आमच्या सरकारच्या काळात आम्ही देखील त्याला वेग दिला होता. तेच काम आधीच्या सरकारने रखडवले होते. मी आणि वर्षा गायकवाड या मंत्री असताना हाच विचार करत होतो की, धारावीकरांचा विकास कसा होईल? या सरकारमध्ये फक्त अदानी आणि मित्रांचा विकास होत आहे. धारावीकरांचा विकास होतो की, नाही? हा खूप मोठा प्रश्न आहे.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, या धारावी पुनर्विकास प्रकल्पात एक ते दीड लाख फॅमिली अपात्र करण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे. धारावी पुनर्विकासासाठी मदर डेअरीच्या जागेबाबत या सरकारने जो जीआर काढला, तो मुलुंड असेल किंवा कुर्ला स्थानिकांचा विरोध असून देखील तो जीआर लादायचा प्रयत्न या सरकारचा आहे. धारावीकरांना मूळ धारावीतच घर मिळायला पाहिजे. मात्र, ते होताना दिसत नाही. याच गोष्टीला आमचा विरोध आहे. यांचे केंद्रात सरकार आहे. राज्यात सरकार आहे. मिहिर कोटेचा बोलले होते मआम्ही जीआर रद्द करू. मात्र आचारसंहिता संपल्यानंतर हा शासन निर्णय रद्द झालेला नाही. हे खोटे बोलणारी लोकं आहेत. तसेच भाजपाचे मन महाराष्ट्र विरोधी आहे. धारावीकरांचा पुनर्विकास झाला पाहिजे आणि तो धारावीतच झाला पाहिजे. हीच आमची मागणी आहे.

हे प्रकरण खा. वर्ष गायकवाड यांनी देखील हे प्रकरण उचलून धरले असून, त्यांच्याच माध्यमातून पोस्टकार्ड मोहीम सुरू करण्यात आली आहे. याबाबत बोलताना वर्षा गायकवाड म्हणाल्या, नक्कीच आम्ही पोस्टकार्ड पाठवत आहोत. मी देशाच्या पंतप्रधान यांना पोस्टकार्ड पाठवणार आहे. आपण जर पाहिले तर या परिसरामध्ये ८०० ते १००० झाडं आहेत. स्थानिकांची मागणी आहे की इथे पब्लिक गार्डन झाले पाहिजे. धारावीचा पुनर्विकास करा ही संकल्पना आम्हीच २००४ मध्ये मांडली होती. तेव्हा टेंडरची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, टेंडरचं मॅन्युपिलेशन करण्यात आले. त्यानंतर डीसी रूल बदलण्यात आले ते पण फक्त एका व्यक्तीच्या फायद्यासाठी बदलले. या सरकारचा मुंबईतील अनेक मोक्याच्या जमिनीचा हडपण्याचा डाव सुरू आहे.

# निमा रन फॉर हेल्थ २०२४ ची नोंदणी प्रक्रिया सुरू

**सातारा :** येथील पोलिस परेड ग्राऊंडवर निमा रन फॉर हेल्थ २०२४ च्या तिसऱ्या पर्वाची घोषणा व नोंदणी प्रक्रिया सातारा हील हाफ मॅरेथॉनचे संस्थापक व साताऱ्यातील मॅरॅथॉन चळवळीचे प्रणेते डॉ संदीप काटे यांच्या शुभहस्ते सुरू करण्यात आली. रविवार २७ ऑक्टोबर, २०२४ रोजी साताऱ्यात निमा रन फॉर हेल्थ २०२४ संपन्न होत आहे. या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून ही रन १० किमी व ३ किमी या २ मुख्य प्रकारासह वेगवेगळ्या वयोगटात होणार आहे.

यावेळी बोलताना डॉ काटे म्हणाले की, रुग्ण आजारी पडल्यानंतर डॉक्टर्स लोकांची रुग्णसेवा नेहमीच करतात. मात्र निमा रन फॉर हेल्थच्या माध्यमातून लोकांनी आजारीच पडू नये, यासाठी देखील डॉक्टर्स प्रयत्न करीत आहेत हे कौतुकास्पद असल्याचे डॉ काटे यांनी नमूद केले. तरी जास्तीत जास्त लोकांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. तसेच निमाचे अध्यक्ष डॉ अनिल शिंगे व निमा रन फॉर हेल्थ २०२४ चे अध्यक्ष डॉ सुधीर पवार यांनी स्पर्धेविषयी उपस्थितांना माहिती दिली. याठिकाणी उपस्थित धावपटूंनी नोंदणी प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यामुळे पहिल्या दिवशीच ५०० नोंदणी फॉर्म्सचे वितरण झाले.

नोंदणी प्रक्रियेची घोषणा करताना उद्घाटक डॉ संदीप काटे यांच्यासह डॉ दीपक बनकर, पंकज नागोरी, डॉ देवदत्त देव, डॉ अश्विनी देव, डॉ कैलास खडतरे, डॉ दीपक थोरात यांच्यासह सातारा हील मॅरेथॉनचे सर्वच आयोजक उपस्थित होते. तसेच निमाचे अध्यक्ष डॉ अनिल शिंगे, खजिनदार डॉ सुधाकर लाड, डॉ अभिराम पेंढारकर, निमा रन फॉर हेल्थ २०२४ चे अध्यक्ष डॉ सुधीर पवार, रेस डायरेक्टर डॉ दयानंद घाडगे, रेस सेक्रेटरी डॉ शुभांगी गायकवाड, रेस कोऑर्डीनेटर डॉ सुनिता चव्हाण व साताऱ्यातील धावपटू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विठू नामाच्या गजरात आळंदी दुमदुमली


**पंढरपूर :** महाराष्ट्रात पंढरपूरच्या आषाढी वारीला मानाचे स्थान आहे. दरवर्षी आषाढी वारीच्यानिमित्ताने मोठा पालखी सोहळा असतो. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीला सुरवात झाली आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आळंदीमधून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. या पालखीमध्ये हजारो वारकरी सहभागी झाले आहेत. आळंदीमधून पंढरपूरकडे जात असताना हजारो वारकरी विठू नामाचा गजर करत पंढरपूरमध्ये पोहचतात.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी आळंदी सजली असून हजारो वारकरी या पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या प्रस्थानासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील आळंदीमध्ये दाखल झाले होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. तसेच वारकऱ्यांशी संवादही साधला.

संत ज्ञानेश्वर महाराजांना मी नमन करतो. आज संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या सोहळ्यासाठी येण्याचं भाग्य मला लाभले. मी संत ज्ञानेश्वर महाराजांना आणि विठुरायाकडे प्रार्थना करतो की, बळीराजा संकट मुक्त होवो. शेतकऱ्यांवरील सर्व संकट दूर होवोत. चांगला पाऊस होवो. तसेच राज्यातील सर्व जनतेला सुख समाधान लाभो, अशी प्रार्थना मी करतोफ्र, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं. तसेच इंद्रायणी नदी पूर्णपणे प्रदुषणमुक्त करण्यासाचे काम सरकारचे आहे. इंद्रायणी नदी प्रदुषणमुक्त करण्यासाठी ८०० कोटींची तरतूद नगर विकास विभागाने केलेली आहे, असंही मुख्यमंत्री शिंदेंनी यावेळी सांगितलं.

आळंदीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला आहे. माऊलींच्या पालखीचं हे १९३ वं वर्ष आहे. इंद्रायणी काठावर लाखो वैष्णवांचा मेळा भरला होता. आळंदीत वारकऱ्यांची मोठी गर्दी केली असून विठू नामाच्या गजरात वारकऱ्यांचा यावेळी उत्साह पाहायला मिळाला आहे.

# क्रिकेट विश्वचषक विजयाबाबत भाकित खरे ठरले



**पुणे :** टी-२० क्रिकेट विश्वचषक भारतच जिंकेल असे केलेले भाकित खरे ठरल्याचा दावा ज्योतिष अभ्यासक सिद्धेश्वर मारटकर यांनी आज पुण्यात पत्रकाद्वारे केला आहे.टी-२० विश्वचषक सामन्याबाबत उपांत्य सामन्यात भारत जिंकेल आणि अंतिम सामन्यात भारत जिंकून विश्वचषक मिळवेल असे भाकीत सोशल मीडियावर त्यांनी केले होते.ही दोन्ही भाकिते खरी ठरली आहेत,असे मारटकर यांनी सांगितले.

यापूर्वी त्यांनी राजकीय घडामोडी, नैसर्गिक संकट, शेअर मार्केट, लोकसभा, विधानसभा निवडणुकींची वर्तविलेली अनेक भाकिते अचूक ठरली आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत एनडीए चे सरकार स्थापन होऊन नरेंद्र मोदी पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील व एनडीएचे सरकार ५ वर्षांचा कालावधी पूर्ण करतील,असे भाकीत वर्तविले होते.

# विधानभवन परिसरात महिला भगिनींकडून औक्षण

**मुंबई :** शिंदे सरकारने आपल्या कार्यकाळातील शेवटच्या अर्थसंकल्पात अनेक नवीन योजनांची घोषणा केली. यात खास महिलांसाठी ममुख्यमंत्री लाडकी बहीणफ नावाची योजना आणली आहे. ही योजना २१-६० वयोगटातील महिलांसाठी आहे. अर्थसंकल्पात महिला- भगिनींसाठी अनेक निर्णय घेऊन त्यांना दिलासा दिल्याबद्दल विविध क्षेत्रातील महिला- भगिनींनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ओवाळून राखी बांधत त्यांचे आभार मानले. तर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी १ जुलैपासून करत असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांना अनोखी ओवाळणी दिली.

विधानभवनाच्या प्रांगणात आज विविध क्षेत्रातील महिला भगिनी एकत्र जमल्या होत्या. विधिमंडळात काल सादर झालेल्या अर्थसंकल्पात महिलांसाठी अनेक निर्णय घेण्यात आले. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना मोठा दिलासा मिळाल्याने त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना ओवाळून राखी बांधून त्यांचे आभार मानले.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अर्थसंकल्पात राज्यातील महिला- भगिनींना दिलासा देणारे अनेक निर्णय आम्ही घेतले आहेत. मुख्यमंत्री माझी बहिण योजनेचा शासन निर्णय देखील तातडीने काढण्यात आला असून त्याचा लाभ येत्या १ जुलैपासून भगिनींना देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना दरमहा पंधराशे रुपये मिळणार आहेत. या निर्णयाचा फायदा अडीच कोटींहुन जास्त महिलांना होणार आहे.

महिलांना वर्षातून ३ सिलेंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही सुरू करण्यात येणार आहे. तसेच २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. बचतगटांतील महिलांचे खेळते भांडवल १५ हजारावरून वाढवून ३० हजार केले आहे. मुलींना उच्च शिक्षणापर्यतचे शिक्षण मोफत देण्याचा, १० हजार महिलाना पिंक रिक्षांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महिलांना मोफत प्रवास, ५० टक्क्यांपर्यत मोफत एसटी प्रवास यापूर्वीच दिलेला आहे, राज्यातील सर्व माता-भगिनींच्या पाठीशी त्यांचा मुख्यमंत्री भाऊराया म्हणून नेहमी पाठीशी असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राखी बांधल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व भगिनींचे आभार मानले.

# फोटोग्राफीची आवड असलेला मुख्यमंत्री झाला तर काय होते? : फडणवीस



**मुंबई :** एखाद्याला एखाद्या गोष्टीत आवड आहे, त्याच गोष्टी त्यांनी कराव्यात. एखाद्याची आवड फोटोग्राफी असेल पण तो मुख्यमंत्री झाला तर काय होते? असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांना लगावला आहे. भा. आमदार अमित साटम यांच्या मउडानफ या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी त्यांनी राजकारणावरही भाष्य केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की व्यस्त राजकारणातून अमित साटम यांनी वेळ काढून पुस्तक लिहिले. मी थोडे वाचले आहे. नवी पिढीला दिशा देण्याचे काम पुस्तकातून केले आहे. आमदार अमित साटम हे आक्रमक राजकारणी आहेत. राजकारण सोडून शांत आणि संयमी व्यक्ती म्हणून अमित साटम प्रसिद्ध आहेत. के श्रीकांत हे ज्याचे आवडते फलंदाज असतील तर आक्रमक आणणारच. ज्या विषयाची पूर्ण माहिती असते, त्या आमदारांमध्ये अमित साटम यांचे नाव येते. अनेक आमदार फक्त व्हिडिओ बनवण्यासाठी बोलतात. फक्त तीन ते चार आमदार असे आहेत ज्यांना विषयाची पूर्ण माहिती असते, त्यातले अमित साटम आहे, अशी स्तुतीस्तुमणे फडणवीस यांनी यावेळी उधळली.

## राज्यात ज्येष्ठांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करणार

**मुंबई :** राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. या योजनेसाठी धोरण आणि नियमावली तयार करून ज्येष्ठांना शासनाच्या माध्यमातून तीर्थस्थळांच्या दर्शनासाठी नेण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यासंदर्भात विधानसभा सदस्य प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, आमचे सरकार सर्वसामान्यांचे असून काल मांडण्यात आलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, कष्टकरी, वारकरी, कामगार, महिला, युवा यांच्यासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. आपला महाराष्ट्र संतांची भूमी असून दरवर्षी अनेक जण तीर्थस्थळांना भेटी देतात. ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन सुलभपणे होण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार आहे.

# नीटपरीक्षा भ्रष्टाचारमुक्त होण्यासंदर्भातील सूचनांचा सकारात्मक विचार : अजित पवार



**मुंबई, :** वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या नीट परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराची केंद्र आणि राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून वेगवेगळ्या यंत्रणांकडून कारवाई सुरु करण्यात आली आहे. दोषींना अटक करण्यात आली आहे. भविष्यात असे गैरप्रकार टाळण्यासाठी केंद्र सरकारने अध्यादेश जारी केला आहे. त्याद्वारे दोषींवर कठोर कारवाईसह मोठ्या आर्थिक दंडाची तरतूद केली आहे. वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेची जबाबदारी पूर्वीप्रमाणे राज्यांकडे सोपविण्याचा विचारही पुढे आला. केंद्र सरकार त्यासंदर्भात तपासणी करुन निर्णय घेणार आहे. दिवसरात्र अभ्यास करुन प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी राज्य शासन बांधिल असून यासंदर्भात विरोधी पक्षांनी सूचविलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार केला जाईल,फ्र अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी अध्यक्ष नाना पटोले आदी सदस्यांनी विधानसभेत नीटपरीक्षेत झालेल्या गैरप्रकाराचा मुद्दा स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला होता. मात्र, अध्यक्षांनी स्थगन फेटाळल्यानंतरही सभागृहात यासंदर्भात माहिती देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, नीट परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे प्रकार देशभरात घडले आहेत असे प्रकार घडू नयेत, दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्नशील आहे. दोषींना कठोर शिक्षा आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक दंडाची तरतूद असलेला अध्यादेश केंद्र सरकारने जारी केला आहे. भविष्यात ही परीक्षा राज्यपातळीवर घेण्याचा प्रस्तावही तपासण्यात येत आहे. मनीटफ परीक्षा पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त व्हावी ही लाखो विद्यार्थ्यांसह, विरोधी पक्ष आणि राज्य सरकारचीही भूमिका आहे. त्यासंदर्भात विरोधी आणि सत्ताधारी पक्षांनी केलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करु, असे आश्वासनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिले.

## युनानी मेडिकल कॉलेज आणि सामाजिक संस्थांच्या वतीने वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

पुणे : सुफी वारकरी विचार मंच,दि मुस्लिम कोऑपरेटिव्ह बँक लि.,झेड.व्ही.एम.युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या वतीने वारीमध्ये आलेल्या वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि औषध वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दि मुस्लिम कोऑपरेटिव्ह बँक रविवार पेठ शाखा येथे १ जुलै रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे शिबीर सुरु रहाणार आहे. दि मुस्लिम को ऑपरेटिव्ह बँक लि.चे अध्यक्ष डॉ. पी.ए.इनामदार,मशकूर शेख,उमर शरीफ शेख,नितीन गोरावडे,रौफ कुरेशी,जमशेद बागवान,भरत चौधरी,इश्तियाक शेख,अखलाक कागदी,मुदस्सर जिनेरीं,मारुफ शेख,अश्फाक सय्यद इत्यादी संयोजन करीत आहेत.

# देशातील जंगल सफारीला टाळे लागणार



**नागपूर :** भारतातील व्याघ्रप्रकल्प, अभयरण्यांमध्ये पर्यटनाची इच्छा असली, तरी पर्यटकांना त्यांच्या इच्छेला आवर घालावा लागणार आहे. कारण, भारतातील सर्व व्याघ्रप्रकल्प आणि अभयारण्याच्या प्रवेशद्वाराला कुलूप लागणार आहे. शाळांना उन्हाळी सुट्या असल्या तरी भारतातील व्याघ्रप्रकल्प, अभयारण्यांना मात्र पावसाळी सुट्या लागतात. येत्या एक जुलैपासून म्हणजेच सोमवारपासून पर्यटनाचे प्रवेशद्वार बंद होणार आहेत. मात्र, या सुट्या व्याघ्रप्रकल्प आणि अभयारण्याच्या कोअर म्हणजेच गाभा क्षेत्राला असून बहुतांश ठिकाणी बफक्षेत्र पर्यटनासाठी खुले ठेवण्यात आले आहे.

# आशा व आरोग्य सेविकांच्या आंदोलनामुळे महानगरपालिकेच्या सेवा बाधित

**मुंबई :** महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत असलेल्या आशा व आरोग्य सेविका यांनी ११ जूनपासून बेमुदत आंदोलन पुकारले. मात्र शिक्षक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकांसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेमुळे आशा व आरोग्य सेविकांनी टप्प्याटप्याने आंदोलन सुरू ठेवले आहे. मात्र, त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांवर होताना दिसत आहे. आशा सेविका व आरोग्य सेविका या मुंबई महानगरपालिकेकडून वस्ती पातळीवर पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेचा कणा समजल्या जातात. घरोघरी आरोग्य उपक्रम राबविण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

आशा आणि आरोग्य सेविका या लहान मुलांचे लसीकरण, ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब व मधुमेह यांची तपासणी, गर्भवती महिलांचे लसीकरण यांसह त्यांना औषधे पुरवणे, त्यांच्यासाठी असलेल्या योजना, नवजात अर्भकांची नोंदणी अशी कामे पार पाडत असतात. मात्र मागील महिन्यापासून आशा व आरोग्य सेविकांनी पुकारलेल्या आंदोलनाचा परिणाम महानगरपालिकेच्या या विविध आरोग्य सेवांवर होत आहे. त्याचप्रमाणे क्षयरोगाला प्रतिबंध करण्यासाठी आयसीएमआर आणि राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन प्रकल्पांतर्गत क्षयरोगग्रस्तांचे बीसीजी लसीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार मुंबईत मार्चपासून १८ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या नागरिकांचे आशा व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू केले.

मात्र या आंदोलनामुळे सर्वेक्षणाचे काम बाधित झाले आहे. तसेच पावसाळ्यातील आजारांबाबत करण्यात येणाऱ्या तपासण्या, साथीच्या आजारांबाबत जनजागृती करणे, ताप आलेल्या रुग्णांचा शोध घेऊन त्यांना रुग्णालयात आणणे या सेवा आंदोलनामुळे बाधित झाले असल्याचे महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटना आणि म्युनिसिपल आशा सेविका युनियनचे अध्यक्ष ड. प्रकाश देवदास यांनी सांगितले.

## कोयना धरणाचा पाणीसाठा झाला 'इतका' TMC

**पाटण :** सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर चांगलाच वाढत असून रविवारी सकाळी ८ वाजेपर्यंत नवजा येथे ५५ मिलीमीटर पाऊस पडला. तर कोयनानगर येथे ७३ आणि महाबळेश्वरला ५४ मिलीमीटरची नोंद झाली आहे. या पावसामुळे कोयना धरणात यावर्षी प्रथमच आवक सुरू झाली आहे. मागील २० दिवसांपासून पाऊस पडत आहे. पूर्व तसेच पश्चिम भागातही पावसाने दमदार हजेरी लावली आहे. दरम्यान, कोयना धरणात सध्या १९.०१ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे.

पश्चिम भागातील कास, बामणोली, तापोळासह पाटण तालुका आणि कांदाटी खोऱ्यात पाऊस सुरू झाल्याने धरणात पाण्याची आवक सुरू झाली आहे.

# पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ; पावसाची उघडझाप

**कोल्हापूर :** कोल्हापूर परिसरात, धरण क्षेत्रात पावसाची उघडझाप सुरू आहे. पश्चिम भागात झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पाणी पातळीत किंचित वाढ होत आहे. पंचगंगा नदीची पाणीपातळीत गेल्या दोन दिवसात तीन फुटाने वाढ झाली असून राजाराम, रुई, इचलकरंजी हे बंधारे शनिवारी पाण्याखाली गेले.

जिल्ह्याच्या पश्चिमेकडील तालुक्यात जोरदार पाऊस पडला होता. गगनबावडा, शाहूवाडी, चंदगड, भुदरगड तालुक्याला पावसाने झोडपले होते. करवीर, शिरोळ, कागल, हातकणंगले, पन्हाळा तालुक्यात उघडझाप सुरु आहे. यामुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून स्थिर असलेल्या येथील पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत अल्पप्रमाणात वाढ होत आहे. राजाराम बंधाऱ्यावर पाणी आले आहे. बंधाऱ्यावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. धोकादायक स्थितीतून वाहने नेऊ नयेत यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**पेरण्याबाबत सावधगिरी**

गेल्या दोन दिवसांपासून स्थिर असलेल्या पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत इंचाइंचाने वाढ होत आहे. जिल्ह्यात अजूनही पेरण्या ५० टक्के इतक्याच झाल्या आहेत. पावसाचा नेमका अंदाज येत नसल्याने शेतकरी सावध भूमिका घेताना दिसत आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर,पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# जिल्ह्यात ऑनलाईन कसिनोचा धुमाकूळ

## चालकांवर तात्काळ कारवाई करा, मनसेचे जिल्हा पोलिस प्रमुख यांना निवेदन

**तासगाव :** सांगली जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये तसेच ग्रामीण भागात ऑनलाईन कसिनो (लॉटरी) चे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. युवा पिढी यात बरबात होत असून ते बंद करून त्या चालकांवर तात्काळ गुन्हे दाखल करा अशी मागणी मनसे नेते अमोल काळे यांनी केली. याबाबत त्यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांना निवेदन दिले.

दिलेल्या निवेदनात अमोल काळे यांनी म्हटले आहे की, कमी वेळेत श्रीमंत होण्याचा आशेने मोठ्या प्रमाणावर पैसे लाऊन अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. दररोज ऑनलाइन लॉटरी च्या नावाखाली लाखो रुपयांची लूट होत आहे. एक मिनिटाच्या या खेळावर लाखो रुपयांची उलाढाल होताना दिसत आहे. आता तर ऑनलाइन लॉटरी च्या नावाखाली खुलेआम गोरगरीब जनतेची लूट सुरू आहे. जिल्ह्यात अनेक तरुण या चक्रव्यूहात गुंतले असून लॉटरीच्या नादासाठी लाखो रुपये गमावून बसले आहेत. अवैध ऑनलाईन कसिनोवाले (लॉटरी) मोठ मोठे अड्डे थाटून बसले आहे.

पोलीस प्रशासन यांबाबत कोणतीही कारवाई करताना दिसून येत नाही. जिल्ह्यातील तरुण पिढी या मार्गाला जाऊन बरबाद होत आहे. तासगाव तालुक्यातील अनिल पाटील या व्यक्तीने जिल्हाभर स्वतःच्या ऑनलाईन कसिनो (लॉटरी) चे जाळे पसरवले आहे व तो हे सर्व तासगाव तालुक्यातूनच हाताळत आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी आमच्याकडे आल्या असून हा अवैध धंदा बंद करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा निवेदनाद्वारे दिला.

# जेष्ठ पत्रकार आनंदा शिंगे यांना आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

**कुरुंदवाड :** कोल्हापूर जिल्हा परिषद मार्फत दिला जाणार आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार शिरटी ता. शिरोळ येथील जेष्ठ पत्रकार आनंदा शिंगे यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री ना. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला

आनंदा शिंगे यांनी गेली चार तपे पत्रकार क्षेत्रात स्वतः ला झोकुन देऊन काम करीत आहेत त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडून नागरिकांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे त्यांच्या या कार्याची दखल कोल्हापूर जिल्हा परिषद यांनी घेऊन जिल्हास्तरीय नामांकित आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.

# कागवाड कर्नाटक पोलिस आणि बेकायदेशीर दूध पावडर वाहतूक करणारा जप्त केलेला टेम्पो



**कागवाड (कर्नाटक) येथून बेकायदेशीर दुधपावडर वाहतूक करणारे दोन टेम्पो ट्रक कागवाड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

**कुरुंदवाड :** कर्नाटक राज्यातील क्षिरभाग्य योजनेअंतर्गत लहान मुलांना देण्यात येणारी दुधपावडर बेकायदेशीर महाराष्ट्रात वाहतूक करत असताना कागवाड (ता. अथनी, कर्नाटक) पोलिसांनी दोन टेम्पो पकडले. यातील सुमारे तीन टन दुधपावडर पोलिसांनी जप्त केले असून तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र कर्नाटक पोलिसांनी तपासाच्या नावाखाली आरोपींचे नावे सांगण्यास नकार दिला आहे.

दरम्यान बेकायदेशीर वाहतूक केली जात असलेली दुध पावडर शिरोळ तालुक्यात भेसळीसाठी आणत असल्याचे कर्नाटक पोलिसांना संशय आला आहे. त्यामुळे शिरोळ तालुक्यातील भेसळ खवा पुन्हा चर्चेत आला असून अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी भेसळखोरांवर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

कर्नाटकात कर्नाटक सरकारने प्राथमिक व माध्यमिक मुलांना पोषण आहारासाठी क्षिरभाग्य योजनेअंतर्गत मुलांना मोफत दुधपावडर दिले जाते. मात्र मुलांच्या पोषण आहाराचे पावडर काळ्या बाजारात राजरोसपणे विक्री होत आहे. शासनाचे हे दुधपावडर विक्रीसाठी नसताना दुधात भेसळ करण्यासाठी शिरोळ तालुक्यात चढ्या दराने घेवून भेसळयुक्त खवा बनवला जात असल्याची चर्चा आहे.

दुधपावडरीची तस्करी करणारी टोळी तालुक्यात सक्रिय असून भेसळयुक्त दुध पदार्थ तयार करणार्या व्यावसायिकांना दुधपावडर विकले जात आहे.

यापूर्वी शिरोळ तालुक्यात दुध व खवा भेसळ करणाऱ्यावर अन्नसुरक्षा अधिकार्यांनी कारवाई केली होती. मात्र आर्थिक तडजोडीतून जुजबी कारवाईमुळे भेसळखोरांवर अंकुशच राहीला नाही.

कर्नाटकातून शिरोळ तालुक्यात बेकायदेशीर वाहतूक होत असलेली कर्नाटकातील दुधपावडर कागवाड पोलिसांनी पकडल्याने शिरोळ तालुक्यातील दुध भेसळीची चर्चा पुन्हा पुढे आली आहे. कर्नाटकात शालेय मुलांच्या तोंडचे घास पळविणाऱ्या व भेसळीतून लोकांच्या जीवाशी खेळ खेळणार्या दुध व खवा भेसळखोरांवर अन्न व औषध प्रशासन कडक कारवाई करणार का असा प्रश्न नागरीकांतून उपस्थित केला जात आहे.

कर्नाटकातील शाळेत देण्यात येणारे दुधपावडर काळ्या बाजारातून बेकायदेशीर वाहतूक करत शिरोळ तालुक्यात येत होती. दुध पावडर कोठे वाहतूक केली जात आहे याचा तपास कागवाड पोलिसांना माहिती

# राज्य शासनाने घेतले सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय : डॉ अरविंद माने

**शिरोळ :** राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी अतिरिक्त अर्थसंकल्प मांडत असताना राज्यातील युवक शेतकरी महिला आदी घटकांच्या हिताचे निर्णय घेत महाराष्ट्राला प्रगतीपथावर अग्रेसर करणाऱ्या योजना राबवण्याचा निर्णय घेत सर्वसामान्यांचे हित जपण्याचा प्रयत्न केला आहे शासनाने जाहीर केलेल्या या योजनेचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा नेहमीच प्रयत्नशील राहील असा विश्वास भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष आणि शिरोळचे माजी नगरसेवक डॉ अरविंद माने यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला .

डॉ अरविंद माने बोलताना म्हणाले की राज्य शासनाने लाडली बहीण या योजनेअंतर्गत २१ ते ६० वर्षे वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी महिना दीड हजार रुपये यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

# वेश्या व्यवसाय प्रकरणी पावन गडाच्या पायथ्याशी असलेल्या फार्म हाऊसवर छापा

**कोल्हापूर :** पन्हाळ गडाचा जोडकिल्ला असलेल्या पावनगडाच्या पायथ्याशी कदमवाडी गावाच्या वाटेवरील माऊली फार्म हाऊसवर वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी शाहूवाडी विभाग आणि पन्हाळा पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पन्हाळा पोलीस निरीक्षक महेश इंगळे आणि शाहूवाडी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी आप्पासाहेब पवार यांच्या पथकानं या फार्म हाऊसवर सापळा रचून छापा टाकला. या छाप्यात लॉजिंग एजंट फातिमा देसाई, सहाय्यक राजेंद्र कांबळे, अमृत गवड हे तीघे वेश्या व्यवसाय चालवत असल्याचं निदर्शनास आलं. त्यानुसार या तिघांसह चार पिडीत महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

या कारवाईवेळी पंधराशे रुपये रोख रक्कम, सात मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा ८६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पथकानं जप्त केला. कारवाई नंतर पथकातील पोलीस शिपाई वैभव बाळासो जाधव यांनी पन्हाळा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून एजंट फातिमा देसाई, सहाय्यक राजेंद्र कांबळे, अमृत गवड यांना अटक केली. त्यांच्यावर पोलिसात गुन्हा दाखल केलाय. आज या तिघांना पन्हाळा न्यायालयात हजर केलं असता, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्यांना मंगळवार पर्यंत पोलीस कोठडी दिलीय. या प्रकरणी अधिक तपास पन्हाळा पोलीस करतायत.



# गांजाचा साठा करुन विक्री करणाऱ्यास अटक

**कोल्हापूर :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शिरोळ तालुक्यातील उमळवाड इथं एका घरावर छापा टाकून गांजाचा साठा करणाऱ्या एकाला ताब्यात घेतले आहे. दिलदार चौगोंडा कांबळे असं त्याचं नाव असून त्याच्याकडून सुमारे दोन लाख रुपये किंमतीचा तब्बल सात किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी जिल्ह्यातील अंमली पदार्थ साठा करणाऱ्यांवर तसेच विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश सर्व प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांना दिले होते. दरम्यान रेकॉर्डवरील गुन्हेगार दिलदार कांबळे हा आपल्या राहत्या घरी अमली पदार्थांचा साठा करून विक्री करत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शिरोळ तालुक्यातील उमळवाड इथल्या

दिलदार कांबळे यांच्या राहत्या घरावर छापा टाकून त्याला ताब्यात घेतलं. या ठिकाणी पोलिसांना तब्बल सात किलो ३०० ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आलाय. पोलिसांनी या ठिकाणाहून गांजासह अन्य साहित्य असा सुमारे एक लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंगपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यवान हाके, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर वाघ,पोलीस उपनिरीक्षक संदीप जाधव,अंमलदार महेश गवळी, खंडेराव कोळी, विजय गुरखे,अमित सर्जे, विनायक चौगले, समीर कांबळे, शिवानंद मठपती, आयुब जमादार, महेश खोत यांनी मिळून केली.

# विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता पालकांचे लक्ष आवश्यक : चंद्रकांत भाट

**शिरोळ :** प्राथमिक शाळेतील शिक्षणामुळेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा पाया अधिक मजबूत व घट्ट होत असतो यामुळे या वयातच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षकांच्याबरोबरच पालकांनीही आपल्या पाल्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन राजाराम विद्यालय शालेय व्यवस्थापन समितीचे



सदस्य व पत्रकार चंद्रकांत भाट यांनी केले.

येथील राजाराम विद्यालय नं. २ या शाळेत पालक मेळावा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि नूतन शिक्षकांचा स्वागत समारंभ असा संयुक्त कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत भाट बोलत होते शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्जेराव कांबळे या समारंभाचे अध्यक्षस्थानी होते

प्रथमता शाळेत नव्याने रुजू झालेले शिक्षक रवींद्र वाघ सुनील घुमाण्णा प्रतिभा साळोखे यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला शाळेतील शिक्षक सनी सुतार त्रिशला येळगुडे रवींद्र वाघ सुनील घुमाण्णा प्रतिभा साळोखे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्जेराव कांबळे सदस्या मनीषा जाधव यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले.

# वारीनिमित्त उद्या पुण्यात सर्व धर्मीय ऐक्य दिंडी

**पुणे :** पंढरपूर वारीनिमित्त उद्या पुण्यात सर्व धर्मीय ऐक्य दिंडी आयोजित करण्यात आली आहे.मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक,रिझवानी मस्जिद ट्रस्ट,सुफी वारकरी विचारमंच आणि साखळीपीर तालीम तालीम राष्ट्रीय मारुती मंदिर यांच्या विद्यमाने दि.१ जुलै रोजी सर्व धर्मीय ऐक्य दिंडीचे आयोजन सकाळी साडे दहा वाजता करण्यात आले आहे.साखळीपीर तालीम(नाना पेठ) येथे सर्वधर्मीय धर्म गुरु,'डॉ.पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटी 'चे कुलपती डॉ. पी.ए.इनामदार,साखळीपीर तालीमचे अध्यक्ष रवींद्र माळवदकर यांच्या उपस्थितीत प्रारंभ होणार असून अंगरशा बाबा दर्गा मार्गे रिझवानी मस्जिद (गंज पेठ)येथे समारोप होणार आहे. डॉ.पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटी 'च्या वतीने वारकऱ्यांना रेनकोट वाटप करण्यात येणार आहे. दिंडीचे हे पाचवे वर्ष आहे.

# सारथी बार्टी महाज्योतीच्या उच्चस्तरीय समितीच्या कार्यपद्धतीवर संशय

## संस्थाचालकांकडुन टेंडर मंजुरीसाठी पैसे मागितल्याचा आरोप

**पुणे :** बार्टी सारथी व महाज्योती, अमृत तसेच तार्ती या स्वायत्त संस्थांमध्ये एकवाक्यता व सुसुत्रता रहावी या हेतूने एक शासनाने ३० ऑक्टोंबर २०२३ ला शासन निर्णय काढून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सचिवीय समिती स्थापन केली व या चारही स्वायत्त संस्थांचे सर्व अधिकार या उच्च स्तरीय समितीला देण्यात आले.परंतु या उच्च स्तरीय समिती मुळे सारथी महाज्योती आणि बार्टी या शासनाच्या स्वायत्त संस्थांची स्वायत्ता पूर्णपणे धोक्यात आलेली असून त्यांचे सारे निर्णय हे मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या हातात आले असून , या स्वायत्त संस्था निर्मितीचा मुख्य उद्देशच मोडीत निघाला आहे. महाज्योती सारथी व बार्टी या संस्थाना विद्यार्थ्यांच्या हिताच्या कल्याणकारी योजना तसेच नियमित कालावधीत सुरू करून चालविणे कठीण झाले असून त्यामुळे विद्यार्थ्यांची परवड होत आहे. म्हणून नुकतेच विद्यार्थ्यांनी हा ३० ऑक्टोंबर २०२३ चा काळा शासन निर्णय रद्द करावा या मागणीसह बार्टी, सारथी व महाज्योतीच्या संशोधक विद्यार्थ्यांनी पुणे ते मुंबई लाँग मार्च काढला होता. हे प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. तर शासनाच्या याच समितीने तार्ती चे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांचे अध्यक्षतेखालील समितीला सारथी, बार्टी व महाज्योती या संस्थांमध्ये जे विद्यार्थी प्रशिक्षण घेतील त्यांच्यासाठी प्रशिक्षण संस्था निवडीसाठी टेंडर काढण्याचे तसेच संस्था निवडीचे सर्व अधिकार या समितीला दिले आहेत. या कमिटीचे विद्यमान अध्यक्ष तार्तीचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड हे असून या प्रक्रियेतील टेंडर कोणाला द्यायचे किंवा कोणाला द्यायचे नाही या विषयी ही समिति निर्णय घेणार आहे.

**टेंडर पास करण्यासाठी ३ लाख मागितल्याचा आरोप**

सद्य स्थितीला या समितीकडे जाहिरातीनुसार , सारथी महाज्योती व बार्टी च्या प्रशिक्षण राबविण्यासाठी अनेक संस्थांचे टेंडर आलेले आहेत.परंतु असे असतांना तार्ती मधे डॉ. राजेंद्र भारुड यांच्या अधिपत्याखाली काम करणारे तातर्ती चे टेंडर कन्सलंट प्रशांत बुधिवंत हे , टेंडर मंजुरीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच टेंडर भरणाऱ्या संस्थांकडे गेलेत. आणि त्या संस्था चालकांना प्रत्येकी संस्थेचे टेंडर मंजुरीसाठी तीन लाख रुपयांची मागणी केली. ही मागणी प्रशांत बुधिवंत यांनी तार्ती चे आयुक्त राजेंद्र भारुड यांचे सांगण्यावरून करीत असल्याचे सांगितले. हे प्रकरण एवढ्यावरच संपले नाही, तर प्रशांत बुधिवंत यांनी तुम्हाला तुम्ही दिलेल्या टेंडर प्रमाणे तीन वर्षासाठी कंत्राट देवू. पण कंत्राट मिळाल्यावर आगवूच तीन वर्षाच्या टेंडर रकमेच्या २५% रक्कम तात्काळ भरावी लागेल असेही सांगितले. काही संस्था चालकांनी विचार करू सांगितल्यावर धमकी देण्यात आली.

हे कळल्यावर महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी या समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र भारुड यांचेवर टेंडर मंजुरीसाठी संस्था चालकांना आपल्या अधीनस्थ अधिकाऱ्यामार्फत पैशे मागण्याचे गंभीर आरोप केले असून, या आशयाचे लेखी पत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे मुख्य सचिव, तसेच सारथी, महाज्योती व बार्टी यांच्या प्रमुखांना पाठविले आहे.

भारुड व बुधिवंत यांना हटविण्याची मागणी

राज्य शासनाने अनेक वर्षानंतर मोठ्या प्रयासाने निर्माण झालेल्या बार्टी ,सारथी व महाज्योती या संस्थांची स्वायत्ता काढून घेवून लाखो विद्यार्थ्यांना मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांच्या मर्जीवर सोडून शिक्षण व प्रशिक्षणातून वंचित करणे सुरू केले आहे. तर दुसरीकडे या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा तार्ती सारख्या संस्थांच्या प्रमुखांनी खुले आम बाजार सुरु केलेला आहे. याबाबत महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी तीव्र खंत व्यक्त केली असून, ही टेंडर प्रक्रिया त्वरित थांबविण्यात येवून, या प्रक्रियेमधून तार्ती चे आयुक्त डॉ राजेंद्र भारुड व प्रशांत बुधिवंत यांना वगळावे अशी मागणी केलेली आहे.

# विधान परिषदेसाठीही अनेकांच्या गुडघ्याला बाशिंगे

**हिंगोली :** लोकसभेची रणधुमाळी संपताच विधान परिषद निवडणुकीची घोषणा झाली आणि हिंगोली जिल्ह्यातुन अनेक नेत्यांनी गुडघ्याला बाशिंगे बांधली आहेत. लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडुन इच्छुक असलेल्या रामदास पाटील सुमठाणकर यांनी लोकसभेसाठी चांगलीच तयारी केली होती. त्यानंतर त्यांनी अपक्ष उमेदवारी ही दाखल केली होती. त्यांनी आपली उमदेवारी परत घ्यावी म्हणून मंत्री गिरीष महाजन व आ. श्रीकांत भारतीय यांनी त्यांचे मन वळविण्यात यश मिळविले. त्यावेळी पक्षातर्फे त्यांना भविष्यात संधी मिळेल असे आश्वासन मिळाले होते.



सारांश विधान परिषदेसाठी इच्छुकांची फिल्डींग

काँग्रेसमध्ये आ.प्रज्ञा सातवांचे नाव आघाडीवर

विधान परिषदेसाठी इच्छुकांची फिल्डींग

यावरून त्यांना संधी मिळेल अशी जिल्ह्यात चर्चा आहे. त्यांच्याच पक्षातील श्रीकांत पाटील चंद्रवंशी हे सुध्दा लोकसभेसाठी इच्छुक होते. त्यांचे पक्षाच्या दिल्लीतील नेत्यांशी असलेल्या संबंधामुळे त्यांना संधी मिळेल, असे त्यांच्या काही समर्थकांना वाटत आहे. भारतीय जनता पक्षातील माजी आ. गजानन घुगे यांनी सुध्दा विधान परिषदेसाठी चांगलीच 'फिल्डींग' लावल्याचे बोलले जात आहे.महायुतीमध्ये कळमनुरीची जागा शिंदेंच्या शिवसेनेकडे असून सध्याचे आमदार संतोष बांगर हेच आगामी विधान सभेत उमेदवार असतील, हे जवळपास निश्चित असल्याने गजानन घुगे हे विधान परिषदेसाठी नशीब आजमावत असल्याची चर्चा आहे. ठराविक कोट्यानुसार भारतीय जनता पक्षाला पाच जागा मिळणार असल्याने हिंगोलीतुन एखाद्याला संधी मिळेल याची शक्यता राजकीय तज्ञांना मात्र अजीबात जाणवत नाही.

काँग्रेसमध्ये आ.प्रज्ञा सातवांचे नाव आघाडीवर

कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या व दिवंगत खासदार राजीव सातव यांच्या पत्नी आ. प्रज्ञा सातव यांचे नाव काँग्रेसमध्ये आघाडीवर असल्याची चर्चा आहे. तीन दिवसांपूर्वी खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी आ. प्रज्ञा सातव (झीरसूर डरीँरी) यांनी आघाडीचा धर्म पाळला नसल्याची तक्रार केली होती. त्यावेळी ही तक्रार विधानसभेची पूर्व तयारी असल्याचे बोलले जात होते; परंतु विधान परिषदेत सातवांचे नाव आघाडीवर असल्याने त्यांना ब्रेक लावण्यासाठी शिवसेनेच्या नथीतून काँग्रेसच्या स्थानिक नेत्यानी तर हा तीर मारला नसावा, अशी ही चर्चा होत आहे.

१२ जुलै रोजी होणार मतदान २५ जून पासुन नामनिर्देशन सुरू झाले असून ५जुलैपर्यंत उमेदवारी दाखल होणार आहे. तोपर्यंत उमेदवारी बाबत चर्चेचे गुर्हाळ सुरूच राहणार असल्याचा अंदाज आहे.

# शनिवार अन् रविवारी सुट्टीच्या दिवशीही सातारा सेतू कार्यालय सुरु

**सातारा :** शाळा, महाविद्यालय तसेच नोकरीसाठी आवश्यक असणारे दाखले काढताना विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जुलै अखेरपर्यंत शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी सातारा सेतू कार्यालय सुरु ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. सातारा प्रांताधिकारी सुधाकर भोसले आणि सातारा तहसीलदार नागेश गायकवाड यांनी कर्मचार्यांना त्याबाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

शाळा तसेच महाविद्यालयात तातडीने दाखले जमा करावे लागतात. त्यामुळे महसूल विभागाने गर्दीचा विचार करून तातडीने दाखले द्यावेत, संगणक प्रणालीतील अडचणी, सतत खंडित होणारा वीजपुरवठा, विविध प्रकारच्या दाखल्यांची वाढलेली मागणी यामुळे दाखल्यांसाठी होणारा विलंब टाळण्यासाठी आणि शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सातारा प्रांताधिकारी सुधाकर भोसले यांना सूचना केल्या आहेत.

दाखल्यांची वाढती मागणी, विद्यार्थ्यांना दाखल्याअभावी शैक्षणिक नुकसान होऊ नये ही बाब लक्षात घेऊन उपविभागीय अधिकारी सुधाकर भोसले, तहसीलदार नागेश गायकवाड यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी संवाद साधला. शनिवार व रविवारी तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. सेतू विभाग सुरू ठेवण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. दोन दिवसांत शैक्षणिक दाखल्यांची मागणी आणि जे दाखले तयार होतील ते तातडीने नागरिकांना देण्याची सूचना तहसीलदार नागेश गायकवाड यांनी केली.

शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेच्या तोंडावर शैक्षणिक दाखल्यांच्या मागणीसाठी पालकांची गर्दी वाढत आहे. विविध अडचणींवर मात करून सेतूमधून जानेवारी २०२४ ते २६ जून २०२४ अखेर ३२ हजार ९२३ दाखल्यांचे वितरण करण्यात आले आहे.





अशाप्रकारे किल्ले रायरेश्वराचे निसर्ग सौंदर्य उजळले आहे. (छाया : शुभम गुरव)

# स्वराज्याची शपथ घेतलेला रायरेश्वर निसर्ग सौंदर्याने उजळला

## किल्ले रायरेश्वर पहाण्यासाठी केली जातेय गर्दी

- शुभम गुरव, क्षेत्र महाबळेश्वर

सातारा जिल्ह्यातील खावलीपासून थोड्याच अंतरावर असलेला व छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची शपथ घेतलेला रायरेश्वर आज निसर्गाला साथ घालत उभा आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत यामुळे रायरेश्वर चे रूपडे पालटू लागले असून किल्ले रायरेश्वराची दृश्ये मंत्रमुग्ध करीत आहेत.सध्या पावसाळी हंगाम असल्याकारणाने तेथील निसर्ग सौंदर्या खुलले असून धुके,पाऊस,धोम धरण या आणि असलेल्या अनेक कारणांमुळे किल्ले रायरेश्वर खुलला आहे.शनिवारी व रविवारी तसेच सुट्टी दिवशी याठीकाणी गर्दी होत असलेली देखील पहायला मिळत आहे.छ. शिवाजी महाराजांनी यांनी याच किल्ले रायरेश्वरावर आपल्या संवंगडांनसमवेत स्वराज्याची शपथ घेतली.या किल्ले रायरेश्वरावर श्री शंभू महादेवाचे मंदिर असून मंदिरात छ.शिवाजी महाराज यांनी घेतलेल्या स्वराज्य निर्मिती शपथीचा फोटो देखील आहे.किल्लावर जाण्यासाठी पायर्या असून किल्लावर गेल्यावर विविध निसर्ग सौंदर्य पहावयास मिळते किल्लावर तळे देखील असून तसेच हा किल्ला सात रंगाच्या मातीसाठी देखील प्रसिद्ध आहे.तसेच किल्ल्लावर लहान मोठ्या निसर्गसंपदा देखील उपलब्ध आहेत.या निसर्ग संपदा मनाला सुखद अनुभव देऊन जातात यामुळे येथे भेट देणार्याला येथून जाऊच नये असं वाटत असते .किल्लावर लोकवस्ती देखील असून शाळा देखील आहे.किल्ले रायरेश्वरावर जाण्यासाठी दोन मार्ग असून एक सातारा जिल्ह्यातून वाई येथून खावली मार्गे तर दुसरा पुणे जिल्ह्यातून भोर मार्गे वडतुंबी-कोर्ले या मार्गे किल्ले रायरेश्वरावर जाता येत आहे. या अद्वितीय ठिकाणाला अनेक ठिकाणाहून अनेक जण भेट देत असतात या दोनही मार्गाने किल्लावर जाताना रस्ता किंचतसा खराब असून काही ठिकाणी दरडी कोसळण्याचा धोका देखील आहे.या रस्तावर प्रशासनाकडून काहीतरी ठोस उपाययोजना करणे अपेक्षित आहे. येथील असलेल्या डोंगर दर्या त्यातून वाहणारे छोटे मोठे खळखळणारे पाणी,दाट धुके , धरणे यामुळे आणि असणार्या विविध निसर्ग सौंदर्याने किल्ले रायरेश्वर चांगलाच उजळला असून महाराष्ट्रातील बरेच पर्यटक व इतिहास प्रेमी तसेच भटकंती करणारे पर्यटक देखील गर्दी करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

ऐतिहासिक रायरेश्वराचे मंदिर

याच किल्लावर श्री शंभू महादेवाचे ऐतिहासिक असे रायरेश्वराचे मंदिर असून हे मंदिर देखील अतिप्राचीन आहे याच मंदिरात छ.शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यासोबत रक्ताचा अभिषेक करीत स्वराज्याची शपथ २७ एप्रिल १६४५ ला घेतली कोन्हीजी जेधे,बाजी पासलकर ,तान्हाजी मालुसरे,सुर्याजी मालुसरे,येसाजी कंक,सुर्याजी काकडे,बापूजी मुदगल,नरसप्रभू गुप्ते,सोनपंत उबीर या आणि अश्या बारा मावळ्यांनी लहान लहान सवंगडी सोबत घेऊन स्वराज्याची शपथ घेण्यात आली.जुन्या काळातील ढाल आणि तलवार देखील या ऐतिहासिक मंदिरात आहे.

१) समुद्र सपाटीपासून रायरेश्वराची उंची साधारण ४००० फूट आहे.
२) रायरेश्वर किल्लावरून कमळगड,पांडवगड,मंगळगड,रायगड,राजगड, विचित्रगड,केंजळगड असे किल्ले नजरेस पडतात
३) रायरेश्वर किल्ला पावसाळ्यात व हिवाळ्यात भेट देण्यासाठी उत्तम ठिकाण
४) किल्लावर गोमुख तलाव,७ रंगाची माती,पांडवलेणी,अस्वल तलाव, रायरेश्वराचे मंदिर पहाण्यासारखे
५)किल्ला एका दिवसात बघण्यासारखा,चढाई सोपी,चढण्यासाठी लोखंडी पायर्या

# याशनी नागराजन यांनी क्षेत्र महाबळेश्वर येथील जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत कार्यालयास दिली भेट



**क्षेत्र महाबळेश्वर :** सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व श्री क्षेत्र महाबळेश्वर ग्रामपंचायतीस भेट दिली.यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे पती कार्तिकेयन एस हे सुद्धा उपस्थित होते. ते कोल्हापूर जिल्ह्याचे सी.ई.ओ .आहेत. मुख्य अधिकारी व त्यांचे पती कार्तिकेयन एस. यांचा यावेळी जी. प. प्राथमिक शाळा क्षेत्र महाबळेश्वर येथे यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मोतलिंग सर व सर्व शिक्षक वृंद शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इत्यादी उपस्थित होते. मुख्य अधिकारी याशनी नागराजन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्याशी गप्पा मारल्या आनंददायी शिक्षण उपक्रमांनुसार विद्यार्थ्यांच्या गमतीजमती पाहिल्या शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यातून त्यांचे विद्यार्थ्यांबद्दल चे आकर्षण दिसून आले. तसेच त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयास देखील भेट दिली यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने देखील त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पंचायत समिती महाबळेश्वर चे गटविकास अधिकारी अरूण मरभळ , सरपंच सुनिल बिरामणे, माजी सरपंच विद्यमान सदस्या सारिका पुजारी, सदस्य अनिल कात्रट, ग्रामसेवक प्रशांत रणपिसे, माजी उपसरपंच प्रदिप कात्रट,धनेश वाडेकर आदी उपस्थित होते.

श्री क्षेत्र महाबळेश्वर येथिल मुख्याधिकारी जिल्हा परिषद सातारा यांच्या भेटी दरम्यान सरपंच सुनील बिरामणे यांनी विकास आराखडा काम सुरू होण्यापूर्वी क्षेत्र महाबळेश्वर येथील स्थानिक ग्रामस्थांची प्रमुख मागणी असलेला गावठाण प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मुख्याधिकारी यांना केले.तसेच मुख्याधिकारी यांना देवस्थान ट्रस्ट येथे स्थानिक ग्रामस्थांना प्रतिनिधित्व नसल्याबाबत अवगत केले.

**मुख्याधिकारी यांनी केले आश्चर्य व्यक्त**

**स्थानिकांना प्रतिनिधित्व मिळण्याबाबत विषय समोर आला असता याबाबत मुख्याधिकारी यांनी आश्चर्य व्यक्त करत स्थानिकांना ट्रस्टमध्ये प्रतिनिधित्व नाही ही गोष्ट आश्चर्यकारक असून अशाप्रकारे स्थानिकांना प्रतिनिधित्व नसणारी ही माझ्या पाहण्यातली एकमेव देवस्थान ट्रस्ट असावी असे मत यावेळी व्यक्त केले.**

# वाई तालुका वारकरी पायी आळंदी वारीच्या दिंडींस प्रारंभ



**सातारा :** वाई तालुक्यातील महागणपती मंदिरासमोर वाई तालुका वारकरी पायी आळंदी वारीच्या दिंडीस प्रारंभ करण्यात आला. वेळी तालुका वारकरी संघटना, कृष्णामाई पंचक्रोशी सोहळा, कमंडलू पंचक्रोशी पायी दिंडी, धौम्य ऋषी पायी वारी, मेरुलिंग दिंडी सोहळा एकत्र करून सर्व दिंड्यांचे आळंदीकडे प्रस्थान झाले.

तालुका वारकरी संघटनेचे अध्यक्ष हभप अशोक महाराज पाटणे यांच्या हस्ते विना पूजन करून गणपती घाटावर पंचपदीने पायवारी सुरू झाली. श्री. पाटणे यांनी वाई परिसराला अध्यात्माची फार मोठी परंपरा असून, ती पुढील पिढीपर्यंत रुजवण्याचे काम समस्त वारकरी समूह करत असल्याची भावना व्यक्त केली.

या प्रसंगी युवा नेते विराज शिंदे, डॉ. नितीन सावंत यांच्यासह वारकरी संघटनेचे भरत बागल, शिवाजी चव्हाण, विजय गाढवे, बबन सपकाळ, रवी भिलारे, किशोर भोसले उपस्थित होते. सर्वोदय सेवा ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष संजय जेधे, बाळासाहेब चोरघोटे, रामदास राऊत, नवीन कांबळे, अप्पा मांढरे, सूर्यकांत कणसे यांच्या हस्ते वारकऱ्यांना फळांचे वाटप करण्यात आले.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा

## सातारा जिल्ह्यातील 'या' ५ ठिकाणी असणार मुक्कामी

**सातारा :** श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सुरू होणार आहे. दि. ६ जुलै २०२४ रोजी पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होणार आहे. दि. ११ जुलै २०२४ रोजी पालखी सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार असून सातारा जिल्हयामध्ये पालखीचे लोणंद, तरडगांव, फलटण व बरड येथे एकूण ५ मुक्काम असणार आहेत. पालखी सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

जिल्हाधिकारी डुडी यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवार दि. ७ जुलै रोजी लोणंद येथे दिवसभर व रात्रीचा मुक्काम असेल तर सोमवार दि. ८ जुलै रोजी सकाळचा विसावा व दुपारचे भोजन लोणंद येथे घेऊन दुपारी लोणंद येथून निघून दुपारचा विसावा चांदोबाचा लिंब येथे होईल तर मुक्काम तरडगांव येथे होणार आहे. मंगळवार दि. ९ जुलै रोजी सकाळी तरडगाव येथून प्रस्थान होईल. सकाळचा विसावा दत्तमंदिर काळज, दुपारचे भोजन निंभोरे ओढा, दुपारचा विसावा वडजल व फलटण दूध डेअरी, रात्रीचा मुक्काम फलटण (विमानतळ).




बुधवार दि. १० जुलै रोजी सकाळी फलटण येथून प्रस्थान, सकाळचा विसावा विडणी, दुपारचे भोजन पिंपरद, दुपारचा विसावा निंबळक फाटा, रात्रीचा मुक्काम बरड येथे असेल. गुरुवार दि. ११ जुलै रोजी बरड येथून प्रस्थान, सकाळचा विसावा साधबुवाचा ओढ, दुपारचे भोजन धर्मपुरी पाटबंधारे बंगला कॅनॉलजवळ, दुपारचा विसावा शिंगणापूर फाटा (पानसकर वाडी) येथून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश व रात्रीचा मुक्काम नातेपुते(जि. सोलापूर).

पालखी सोहळ्यासाठी प्रशासनातर्फे पुढीलप्रमाणे कार्यवाही केली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळयाचे सातारा जिल्ह्यामध्ये आगमन व स्वागत करणे कामी मौजे पाडेगांव येथे जय दुर्गा मंगल कार्यालयाचे समोर स्वागत मंडप उभारण्याचे काम व सातारा जिल्ह्यातील सर्व मान्यवर व प्रशासकीय अधिकारी यांची बसण्याची व्यवस्था करणेची कार्यवाही सुरु आहे.

पालखी विसावा, पालखी तळावरील झाडे झुडपे काढणेबाबत संबंधित यंत्रणांना कार्यवाही सुरु आहे. महसूल विभाग, स्वच्छता विभाग, पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, आणि गृह विभाग या विभागातील सर्व मिळून एकूण ३ हजार १३२ अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी कळविले आहे.

पालखी महामार्गावरील खडडे, साईडपटटया तसेच पालखी तळावर मुरुम/खच टाकून रोलिंग करावयाचे कामकाज सुरु आहे. पालखी विसावा चबुतऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट तसेच पालखी विसावा व पालखी तळाकडे जाणारे अंतर्गत रस्ते सुस्थितीत ठेवणेचे काम जिल्हा परिषद बांधकाम कडून करणेत आले आहे. शौचालय उभारणी ठिकाण व संख्या तसेच मैला गाळ व्यवस्थापन ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेस ६ कोटींचा नफा, सभासदांना ६ टक्के लाभांश जाहीर

**आसनगाव :** पश्चिम महाराष्ट्रात ५३ शाखांचा विस्तार करीत सर्वांचा विश्वास संपादन केलेल्या पिंपोडे बुद्रुक ता.कोरेगाव येथील छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेस अहवाल सालात ६ कोटी ६३ लाख ढोबळ नफा झाला असून आवश्यक तरतूदी वजा जाता निव्वळ नफा ४ कोटी १ लाख ४८ हजार झालेला आहे.त्यातून सभासदांना ६ टक्के लाभांश वाटणी करण्याची शिफारस संचालक मंडळाने केली आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी संस्थेच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल वाचन करताना दिली.



**अहवाल वाचन करताना रामभाऊ लेंभे, शेजारी चेअरमन डॉ.सोपानराव चव्हाण, व्हाईस चेअरमन श्रीकांत शेटे व संचालक मंडळ.**

पश्चिम महाराष्ट्रात अग्रेसर असलेल्या छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पिंपोडे बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज सांस्कृतिक भवनमध्ये शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ.सोपानराव चव्हाण होते.प्रारंभी मागील सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करण्यात आले.प्रास्ताविक व स्वागत करताना संस्थापक लेंभे यांनी सभेपुढे ठेवलेल्या विषयांचे वाचन केले.सभेपुढील सर्व विषयांना सभासदांनी हात उंचावून एकमताने मंजूरी दिली. गतवर्षीच्या संमिश्र व्यवसायात १६८ कोटी ८७ लाखांची वाढ झालेली असून ३१ मार्च २०२४ अखेर संस्थेचा संमिश्र व्यवसाय ११६५ कोटी ४ लाख झालेला आहे.अहवाल सालात सर्वच बाबतीत लक्षणीय वाढ झालेली असून ठेवींमध्ये ९० कोटी ५ लाखांची वाढ होऊन ३१ मार्चअखेर ६६१ कोटी २९ लाख ठेवी जमा झालेल्या आहेत.गेल्या ३५ वर्षात ही सर्वात जास्त विक्रमी वाढ झालेली असून याचे श्रेय संस्थेचे संचालक मंडळ, सल्लागार, खातेदार, ग्राहक, सभासद व सेवक वर्ग यांना जाते.गेली ३४ वर्षे प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल वाचन करताना आदर्श परंपरा लाभलेल्या या संस्थेचा अभिमान वाटतो.संस्थेचे खेळते भांडवल ७४२ कोटी ७५ लाख असून ७२७०३ सभासद संख्या आहे.संस्थेचा स्वनिधी अद्यापही कमी असून भागभांडवल वाढविणे आवश्यक आहे.त्यासाठी सर्व सभासदांनी संस्थेचे जास्तीत जास्त भाग घेऊन सहकार्य करावे असे आवाहन संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी केले.चेअरमन डॉ.सोपानराव चव्हाण म्हणाले, सेवकांना कर्जवाटप वाढ, व्यवसाय वाढीचे उद्दिष्ट दिले आहे.यावर्षी कसल्याही परिस्थितीत ६ कोटींचा नफा संस्थेस झाला पाहिजे.म्हणजे पुढील वर्षी यापेक्षा जास्त लाभांश सभासदांना देता येईल.

व्हाईस चेअरमन श्रीकांत शेटे, जेष्ठ संचालक सुरेशबापू साळुंखे, अशोकराव लेंभे यांची भाषणे झाली.प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन व प्रतिमेसमोर दिपप्रज्वलन करण्यात आले.सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून पिंपोडे बुद्रुक येथील जेष्ठ किर्तनकार ह.भ.प.आनंदराव लेंभे शास्त्री नाना यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.सूत्रसंचालन विठ्ठल माने यांनी केले. कार्यकारी संचालक भावेश ढमाळ यांनी आभार मानले.व्यासपिठावर संचालक रावसाहेब लेंभे, जयवंत घोरपडे,भरत साळुंखे, हणमंतराव निकम, तात्यासाहेब ढमाळ, संजय भोसले, श्रीमती सुलभा अरूण साळुंखे,सौ.उषा अशोकराव पवार, गौतम कांबळे, सतीश बिचुकले, नारायण सोनावणे, विजय पतसंस्थेचे चेअरमन विश्वासराव धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.सभेस सभासदांची लक्षणीय उपस्थिती होती.

# उत्तरमांड नदीपात्रात विद्युत मोटर चोरणाऱ्या माजगावातील तिघांना अटक



**कराड :** शेतीच्या पाण्यासाठी वापरण्यात येणारी उत्तरमांड नदीपात्रातील विद्युत मोटर चोरी केल्याप्रकरणी पाटण तालुक्यातील माजगाव येथील तीन जणांना मल्हारपेठ पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून मोटर जप्त करून त्यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अजय बापूराव जाधव (वय ३३), पंकज सुनील पाटील (२७), संभाजी ऊर्फ गणेश शिवाजी भोसले (३४, सर्व रा. माजगाव, ता. पाटण) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. याबाबत शकील अब्दुल मुल्ला (रा. गमेवाडी, ता. पाटण) यांनी फिर्याद दिली होती.

मल्हारपेठ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गमेवाडी गावच्या हद्दीतील गट नं. २९/५ मधील चिरखाणी नावाच्या शिवारात उत्तरमांड नदी पात्रात शेतीला पाणी पाजण्यासाठी ठेवलेली सुमारे १८ हजार रूपये किमतीची ५ एच.पी. क्षमतेची पाण्यातील इलेक्ट्रिक मोटार केबल कापून अज्ञात इसमाने चोरून नेली होती. याबाबतची फिर्याद शकील मुल्ला यांनी दिल्यानंतर मल्हारपेठ पालिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनास्थळी सपोनि चेतन मछले यांनी तत्काळ भेट देऊन गुन्हा उघडकिस आणण्याच्या सूचना चाफळ दुरक्षेत्रातील पोलिस कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या होत्या.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये गोपनीय बातमीदारामार्फत काही लोकांची माहिती प्राप्त झाली. त्यादृष्टीने संबंधित लोकांच्या हालचाली पडताळल्या. त्यामध्ये तीन इसमांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. त्यामुळे त्यांना पोलिस ठाणे येथे आणून त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी सदरची चोरी केल्या बाबतची कबुली दिली. संशयित आरोपींच्या ताब्यातील पाण्यातील इलेक्ट्रिक मोटर जप्त करुन त्यांना अटक करण्यात आली. सपोनि चेतन मछले यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उपनिरिक्षक नितीश पोटे, रामराव वेताळ, पो.कॉ. सिद्धनाथ शेडगे आदींनी ही कारवाई केली.